ePaper
PCMC, वसई विरार, जालना, चंद्रपूर, नांदेड, मालेगाव महापालिकांसाठी आरक्षण सोडत जाहीर

वर्ष - 9 । अंक -80 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज ™

www.mahaenews.com | बुधवार, दि. 12 नोव्हेंबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!



**आतील पानांत**
- जम्मू काश्मीरचा दिल्लीला दणका!
- 'आज मेरे यार की शादी है'
- 'एक्झिट पोल'चा कौल NDAला
- इंजिनिअरला महिलेने लुटलं

## राज्य मंत्रिमंडळाची मोठी घोषणाबाजी कोट्यवधींचा वर्षाव, विकासाला नवी चालना!

# शेतकऱ्यांचे नशीब पालटणार!

## पाच ऐतिहासिक निर्णय, शेतकऱ्यांना थेट लाभ-बँकांचे पुनरुज्जीवन, न्यायव्यवस्थेला सुरक्षा, विकासकामांना निधीची साथ!

। मुंबई । प्रतिनिधी ।
महाईन्यूज

**राज्य मंत्रिमंडळाच्या आज झालेल्या महत्त्वपूर्ण बैठकीत शेतकरी, न्यायव्यवस्था आणि विकास प्रकल्पांच्या दृष्टीने पाच मोठे निर्णय घेण्यात आले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या या बैठकीत सरकारने तब्बल कोट्यवधींच्या तरतुदींना मंजुरी देत राज्याच्या आर्थिक आणि कृषी क्षेत्राला मोठा हातभार लावला आहे. या निर्णयांमुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थितीत सकारात्मक बदल घडेल, न्यायमूर्तींच्या सुरक्षेत वाढ होईल आणि पायाभूत सुविधा विकासालाही वेग मिळणार आहे.**

**पहिला निर्णय :** जिल्हा बँकांना ८२७ कोटींचा दिलासा — शेतकऱ्यांना पीककर्जाचा दिलासा!

शेतकऱ्यांना सुलभपणे पीककर्ज उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती बँकांचे पुनरुज्जीवन करण्याचा निर्णय आजच्या बैठकीत घेण्यात आला. राज्य सरकारकडून नाशिक, नागपूर आणि धाराशिव जिल्हा मध्यवर्ती बँकांना एकूण ८२७ कोटी रुपयांचे भागभांडवल स्वरूपात अर्थसहाय्य देण्यास मान्यता मिळाली. नाशिक जिल्हा बँकेला मिळणार ६७२ कोटी रुपये, नागपूर जिल्हा बँकेला ८१ कोटी, तर धाराशिव जिल्हा बँकेला ७४ कोटी रुपये देण्यात येणार आहेत.

या निधीमुळे शेतकऱ्यांना वेळेत कर्जपुरवठा होऊन कृषी क्षेत्रातील गती वाढेल. भारतीय रिझर्व्ह बँकेच्या शिफारशीनुसार या बँकांचे पुनर्भांडवलीकरण करून आर्थिक स्थैर्य वाढवण्याचे पाऊल उचलण्यात आले आहे.

**दुसरा निर्णय :** न्यायव्यवस्थेला अतिरिक्त सुरक्षा — ८,२८२ सुरक्षारक्षकांची नियुक्ती

राज्यातील न्यायालये आणि न्यायमूर्तींच्या सुरक्षेसाठी ८,२८२ सुरक्षारक्षकांची नियुक्ती करण्यासही मंत्रिमंडळाची मंजुरी मिळाली आहे. महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ (एमएसएससी) यांच्या माध्यमातून हे रक्षक नियुक्त केले जाणार आहेत.

यातील ४,७४२ रक्षक न्यायालयांसाठी, तर ३,५४० रक्षक न्यायमूर्ती आणि न्यायाधीशांच्या निवासस्थानी तैनात केले जातील.

या निर्णयासाठी ४४३ कोटी २४ लाख रुपयांची आर्थिक तरतूद करण्यात आली आहे. ही वाढती सुरक्षा व्यवस्था मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठे, कोल्हापूर सर्किट बेंच, तसेच जिल्हा न्यायालये या सर्व ठिकाणी लागू होणार आहे.

न्यायव्यवस्थेच्या सन्मान व सुरक्षिततेचा विचार करून घेतलेला हा ऐतिहासिक निर्णय असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी बैठकीत नमूद केले.



## विकास आणि सुरक्षा दोन्हीला चालना

राज्य सरकारच्या या पाच निर्णयांमुळे कृषी, वित्त, न्याय आणि जलसिंचन या सर्व क्षेत्रांना नवा बळ मिळणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बैठकीनंतर सांगितले की, "राज्याच्या विकासात शेतकरी आणि न्यायव्यवस्था हे दोन्ही घटक महत्त्वाचे आहेत. सरकार दोघांनाही सक्षम बनवण्यासाठी ठोस निर्णय घेत आहे." या घोषणांमुळे ग्रामीण भागात पायाभूत सुविधा निर्माण होतील, न्यायव्यवस्थेचा सन्मान वाढेल आणि शेतकऱ्यांना आर्थिक स्थैर्य मिळेल, असा विश्वास राज्य सरकारने व्यक्त केला आहे.

**तिसरा निर्णय :** पाचव्या वित्त आयोगाच्या शिफारशींचा कालावधी वाढवला.

राज्य सरकारने पाचव्या वित्त आयोगाच्या शिफारशींची अंमलबजावणी मार्च २०२६ पर्यंत वाढविण्याचा निर्णय घेतला आहे. हा आयोग २०१८ मध्ये स्थापन झाला होता आणि २०२५ पर्यंत त्याचा कालावधी निश्चित होता. मात्र सहाव्या वित्त आयोगाच्या प्रक्रियेला विलंब झाल्याने कालावधी आणखी एका वर्षासाठी वाढविण्यात आला आहे.

### ८२७ कोटींचा निधी — नाशिक, नागपूर, धाराशिव जिल्हा बँकांना अर्थसहाय्य

### ८,२८२ सुरक्षारक्षकांची नियुक्ती — न्यायालये व न्यायाधीशांसाठी सुरक्षा वाढवली

### वित्त आयोगाच्या शिफारशींचा कालावधी वाढला — मार्च २०२६ पर्यंत

### डिग्रस तलावासाठी ९०.६१ कोटी — ६०३ हेक्टर जमीन सिंचनाखाली

### सुकळी तलावासाठी १२४ कोटी — पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटणार

नव्या सहाव्या वित्त आयोगाच्या अध्यक्षपदी डॉ. नितीन करीर यांची नियुक्ती करण्यात आली असून ते २०२६ पासून लागू होणाऱ्या पुढील पाच वर्षांच्या शिफारशी सादर करतील.

या निर्णयामुळे स्थानिक स्वराज्य संस्थांना आणि वित्तीय व्यवस्थेला सातत्य मिळणार आहे.

**चौथा निर्णय :** हिंगोलीतील डिग्रस साठवण तलावासाठी ९० कोटी ६१ लाखांचा निधी

हिंगोली जिल्ह्यातील डिग्रस गावाजवळील नाल्यावर ३.७१ द.ल.घ.मी. क्षमतेचे मातीचे धरण बांधण्यात येणार आहे. या डिग्रस साठवण तलाव प्रकल्पासाठी ९० कोटी ६१ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

या प्रकल्पामुळे हिंगोली तालुक्यातील डिग्रस, लोहगाव आणि दाटेगाव या गावांतील ६०३ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. तसेच स्थानिकांना पिण्याच्या पाण्याचा स्थायी पुरवठा उपलब्ध होणार आहे.

या प्रकल्पामुळे हिंगोली जिल्ह्यातील औद्योगिकरण आणि शाश्वत शेतीला नवी चालना मिळणार आहे.

**पाचवा निर्णय :** हिंगोलीतील सुकळी साठवण तलावासाठी १२४ कोटींचा निधी

हिंगोली जिल्ह्यातील सेनगाव तालुक्यातील सुकळी साठवण तलाव प्रकल्पालाही मंत्रिमंडळाची हिरवी झेंडी मिळाली आहे. या प्रकल्पासाठी १२४ कोटी ३६ लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.

**‘एसआरए’ला प्रकल्पा स्थगिती**

## एकनाथ शिंदेकडून ‘एसआरए’ला प्रकल्पा स्थगिती

# ‘शाहू वसाहती’चा स्वयंपुनर्विकास होणार !

## स्वयंपुनर्विकासाचा मार्ग मोकळा

। पुणे।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पर्वतीमधील शाहू वसाहतीच्या झोपडपट्टी पुर्नवसनाला थेट उपमुख्यमंत्री आणि गृहनिर्माणमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्थगिती दिली आहे. त्यामुळे शाहू वसाहतीचा स्वयंपुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. या वसाहतीमधील नागरिकांनी एकत्र येत त्यासाठी दिलेल्या लढ्यालाही या निर्णयामुळे यश आले आहे.**



पर्वती येथील स. नं. ९२ पैकी फायनल प्लॉट नं. पै. व स. नं. ९३ पैकी फायनल प्लॉट न. ५११ पैकी ५११ अ . पै. ५११ ब पै.येथे गेल्या पन्नास वर्षांहून अधिक नागरिक वास्तव्यास असून येथील घरे ही दुमजली पक्की स्वरूपाची आहेत. मात्र, एका बिल्डर्ससाठी एसआरए स्कीम राबविण्यासाठी झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी बेकायदा झोपडपट्टी पुर्नवसन योज़ना राबविण्याचा घाट घातल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला होता. त्यामुळे शाहू वसाहतीतील या पुर्नवसन प्रकल्प रद्द करण्यासाठी कार्तिक ढमढेरे यांच्या अध्यक्षतेखाली अखिल शाहू वसाहत बचाव कृती समिती स्थापन करण्यात आली होती.बांधकाम व्यावसायिकाकडून धमकावून एसआरए योजनेत सहभागी होण्यासाठी दबाव टाकण्यात येत होता.झोपडपट्टी पुर्नवसन प्रकल्पाला विरोध असल्याचे स्टॅम्प पेपरवर लिहून देण्यात आले होते. मात्र त्यानंतरही येथील रहिवाशांचा एसआरए योजनेत समावेशाबाबत खोट्या सह्या दाखविण्यात आल्या होत्या. त्यामुळे अखिल शाहू वसाहतीचे सर्व नागरिकांनी एसआरएला तीव्र विरोध दर्शवत लढा उभारला. सामाजिक कार्यकर्ते हेमंत बागुल यांनीही त्याला पाठिंबा दिला.या कृती समितीने उपमुख्यमंत्री आणि गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे दाद मागितली होती. काही दिवसांपूर्वी या स्थानिक नागरिकांनी पुण्यात एकनाथ शिंदे यांचीही भेट घेतली होती. त्यावेळी हा प्रकल्प स्थगित करण्यात येईल, असे आश्वासन शिंदे यांनी दिले होते. त्यानंतर तत्परने सर्व बाबी तपासून शाहू वसाहतीमधील एसआरए प्रकल्प रद्द करण्यात आला आहे. या प्रकल्पाला स्थगिती देत असल्याचे आदेशही काढण्यात आले आहेत. त्यामुळे शाहू वसाहतीचा स्वयंपुनर्विकास करण्यात येईल, असे अखिल शाहू वसाहत बचाव समितीने स्पष्ट केले. पर्वतीमधील शाहू वसाहतीच्या झोपडपट्टी पुर्नवसनाला थेट उपमुख्यमंत्री आणि गृहनिर्माणमंत्री एकनाथ शिंदे यांनी स्थगिती दिली आहे. त्यामुळे शाहू वसाहतीचा स्वयंपुनर्विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे. या वसाहतीमधील नागरिकांनी एकत्र येत त्यासाठी दिलेल्या लढ्यालाही या निर्णयामुळे यश आले आहे. पर्वती येथील स. नं. ९२ पैकी फायनल प्लॉट नं. पै. व स. नं. ९३ पैकी फायनल प्लॉट न. ५११ पैकी ५११ अ . पै. ५११ ब पै.येथे गेल्या पन्नास वर्षांहून अधिक नागरिक वास्तव्यास असून येथील घरे ही दुमजली पक्की स्वरूपाची आहेत. मात्र, एका बिल्डर्ससाठी एसआरए स्कीम राबविण्यासाठी झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांनी बेकायदा झोपडपट्टी पुर्नवसन योज़ना राबविण्याचा घाट घातल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला होता. त्यामुळे शाहू वसाहतीतील या पुर्नवसन प्रकल्प रद्द करण्यासाठी कार्तिक ढमढेरे यांच्या अध्यक्षतेखाली अखिल शाहू वसाहत बचाव कृती समिती स्थापन करण्यात आली होती.बांधकाम व्यावसायिकाकडून धमकावून एसआरए योजनेत सहभागी होण्यासाठी दबाव टाकण्यात येत होता.देण्यात आले होते. मात्र त्यानंतरही येथील रहिवाशांचा एसआरए योजनेत समावेशाबाबत खोट्या सह्या दाखविण्यात आल्या होत्या. त्यामुळे अखिल शाहू वसाहतीचे सर्व नागरिकांनी एसआरएला तीव्र विरोध दर्शवत लढा उभारला. सामाजिक कार्यकर्ते हेमंत बागुल यांनीही त्याला पाठिंबा दिला.या कृती समितीने उपमुख्यमंत्री आणि गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडे दाद मागितली होती.

### शाहू वसाहत बचाव समितीने स्पष्ट केले

काही दिवसांपूर्वी या स्थानिक नागरिकांनी पुण्यात एकनाथ शिंदे यांचीही भेट घेतली होती. त्यावेळी हा प्रकल्प स्थगित करण्यात येईल, असे आश्वासन शिंदे यांनी दिले होते. त्यानंतर तत्परने सर्व बाबी तपासून शाहू वसाहतीमधील एसआरए प्रकल्प रद्द करण्यात आला आहे. या प्रकल्पाला स्थगिती देत असल्याचे आदेशही काढण्यात आले आहेत. त्यामुळे शाहू वसाहतीचा स्वयंपुनर्विकास करण्यात येईल, असे अखिल शाहू वसाहत बचाव समितीने स्पष्ट केले.

# बाणेर भागातील शेतात चक्क ‘हुक्का पार्लर’

## 48 हजारांचा मुद्देमाल जप्त; हुक्का पार्लरवर पोलिसांनी कारवाई

। पुणे ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**बाणेर भागातील एका शेतात बेकायदा सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर पोलिसांनी कारवाई केली. पोलिसांनी तेथे छापा टाकून हुक्कापात्र, सुगंधी तंबाखू असा ४८ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.**




या प्रकरणी संबंधित हुक्का पार्लरचा मालक, शेत जमिनीचा मालक, व्यवस्थापकासह कामगारांविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत पोलीस कर्मचारी वाघेश कांबळे यांनी चतुःश्रृंगी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. आरोपींविरुद्ध सिगारेट, अन्य तंबाखूजन्य उत्पादने (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चतु:श्रृंगी पोलिसांकडून ८ नोव्हेंबर रोजी सराइतांची चौकशी करण्यात येत होती.तेव्हा तपास पथकातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना औंध-बाणेर लिंक रस्त्यावरील शेतात ‘फार्म कॅफे’ असून, तेथे बेकायदा हुक्का पार्लर चालविले जात असल्याची माहिती मिळाली. त्यानंतर पोलिसांनी तेथे छापा टाकून कारवाई केली. या कारवाईत पोलिसांनी काचेचे २० हुक्का पात्र, सुगंधी तंबाखू असा ४८ हजार ६५० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.अतिरिक्त पोलीस आयुक्त मनोज पाटील, उपायुक्त सोमय मुंडे, सहायक आयुक्त विठ्ठल दबडे यांच्या मार्गदर्शनाखाली चतु:श्रृंगी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उत्तम भजनावळे, गुन्हे शाखेच्या निरीक्षक अश्विनी ननावरे, सहायक निरीक्षक अनिकेत पोटे, पोलीस हवालदार बाबासाहेब दांगडे, इरफान मोमीन, श्रीकांत वाघवले, बाबुलाल तांदळे तुषार गिरंगे यांनी ही कारवाई केली.

### कायद्याचे पालन करण्याचे निर्देश

राज्य शासनाने हुक्का पार्लरवर बंदी घातली होती. पुणे, पिंपरी-चिंचवड शहरातील बेकायदा हुक्का पार्लरवर पोलिसांनी वेळोवेळी कारवाई केली होती. पोलिसांनी कारवाई केल्यानंतर शहरात बेकायदा हुक्का पार्लर चालविले जातात. हुक्का पार्लरवर बंदी आदेशाचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत.मुंबई उच्च न्यायालयाने १४ ऑक्टोबर रोजी शहरातील रेस्टॉरंटमध्ये निकोटिन किंवा तंबाखू विरहित हर्बल हुक्का विकण्यास काही अडचण नाही, तसेच सिगारेट व इतर तंबाखू उत्पादने कायद्याचे पालन करण्याचे निर्देशही दिले होते.

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणूकः स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीला मुहूर्त

# भाजपाला अनुकूल राष्ट्रवादीला फटका !

## -अनुकूल प्रभागांसाठी राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांची धावाधाव!

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या तब्बल साडेतीन वर्षाहून लांबलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीला मुहूर्त लागला आहे. या निवडणुकीसाठी आरक्षण सोडत मंगळवारी काढण्यात आली. ही आरक्षण सोडत पाहिल्यानंतर भाजपला अनुकूल असे चित्र दिसून येत आहे तर दुसरीकडे राष्ट्रवादीच्या अनेक दिग्गजांना फटका बसला असून प्रस्थापितांना आपला बांधलेला प्रभाग सोडून अनुकूल प्रभागासाठी इतरत्र धावाधाव करावी लागणार आहे.**



पिंपरी चिंचवड महापालिका कार्यक्षेत्रात 2017 ला भाजपने 128 पैकी 77 जागा जिंकल्या होत्या. तर, 2012 मध्ये थम्पिंग मेजॉरिटी मध्ये ८३ जागा मिळविलेल्या राष्ट्रवादीला 2017 मध्ये आमदार महेश लांडगे आणि दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप या जोडगोळीने अक्षरशः धोबीपछाड करत विरोधकांच्या बाकावर बसवले. 2017 मध्ये राष्ट्रवादीला केवळ 36 वर समाधान मानून विरोधी बाकावर बसावे लागले होते.

**प्रस्थापितांना धक्का**

पिंपरी चिंचवड महापालिका निवडणुकांसाठी आरक्षण जाहीर करण्यात आले आहे. ३२ प्रभागातील 128 जागांसाठी आरक्षण सोडत मंगळवारी पार पडली. यात विधानसभा उपाध्यक्ष अण्णा बनसोडे यांचा मुलगा सिद्धार्थ बनसोडे ज्या दोन प्रभागातून तयारी करत होता. तिथे महिलांसाठी आरक्षण जाहीर झाले आहे . यामुळे आता अन्य प्रभागाचा विचार आमदार बनसोडेना करावा लागणार आहे.

यासोबतच भाजपच्या सत्तेतील पहिल्या स्थायी समिती सभापती सीमा सावळे, शरद पवार गटाचे शहराध्यक्ष तुषार कामठे, पिंपरी विधानसभेची निवडणूक शरद पवारांच्या तिकिटावर लढलेल्या सुलक्षणा शिलवंत यांना ही धक्का बसला आहे. यांसह अन्य माजी नगरसेवकांना इतर प्रभागातून चाचपणी करावी लागणार आहे. याशिवाय आशा शेडगे, तुषार कामठे, मयूर कलाटे, शाम लांडे, सुलक्षण शिलवंत धर यांच्या सह अनेक दिग्गजांना अपेक्षित आरक्षण पडले नाही. झालेल्या या सोडत कार्यक्रमांनुसार दिग्जनाना बांधलेला प्रभाग सोडून इतरत्र धावाधाव करावी लागणार आहे.

**भाजपचा शंभर प्लस निर्धार**

भाजप पिंपरी चिंचवड शहरामध्ये चांगली कामगिरी करेल असा दावा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांनी केला आहे. मागील पंचवार्षिकच्या तुलनेत अधिक चांगल्या प्रकारे कामगिरी करून शंभर प्लस जागा जिंकण्याचा निर्धार भाजपने केलाआहे.

> नुकतीच आरक्षण सोडत जाहीर झाली. यानुसार पडलेली आरक्षणे ही भाजपला अनुकूल अशी आहेत. भाजपामध्ये येण्यास शहरातील अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी इच्छुक आहेत. महापालिका निवडणुकीसाठी सक्षम उमेदवार भाजपकडे आहेत. कार्यकर्त्यांच्या जोरावर ही निवडणूक नक्कीच यशस्वी होणार आहे. या निवडणुकीत महापौर हा भाजपचाच असेल असा विश्वास आहे.
> **-शंकर जगताप,** निवडणूक प्रमुख, पिंपरी चिंचवड शहर.

> भाजपामध्ये येण्यास शहरातील अनेक कार्यकर्ते पदाधिकारी इच्छुक आहेत. महापालिका निवडणुकीसाठी सक्षम उमेदवार भाजपकडे आहेत. शहरातील विकासकामे आणि शाश्वत विकासाचे व्हिजन तसेच कार्यकर्त्यांच्या जोरावर ही निवडणूक नक्कीच यशस्वी होणार आहे. या निवडणुकीत महापौर हा भाजपचाच असेल असा विश्वास आहे.
> **-शत्रुघ्न काटे,** शहराध्यक्ष, भाजपा, पिंपरी चिंचवड शहर.

# सोसायट्यांमध्ये वाहतूक पोलिसांकडून 'ट्रॅफिक बडी' ची जनजागृती!

## वाहतूक पोलिसांकडून 'ट्रॅफिक बडी' चॅटबॉट विकसित; पोलिसांकडून विविध सोसायट्यांमध्ये जनजागृती

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**तुमच्या भागांत वाहतूक कोंडी, बेकायदेशीर पार्किंग होत आहे. रस्तेही खराब आहेत. मग, चिंता करु नका. अशा दैनंदिन समस्यांची पुराव्यांसह तक्रार नोंदवता यावी, यासाठी पोलिसांनी 'ट्रॅफिक बडी' चॅटबॉट विकसित केला आहे. त्याबाबत पोलिसांकडून विविध सोसायट्यांमध्ये जनजागृती केली जात आहे.**



पिंपरी चिंचवड पोलिस आयुक्तालय व वाकड वाहतूक विभागाच्यावतीने वाकड येथील सोसायट्यांमध्ये 'वाहतूक मित्र' जागरूकता सत्र हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यामध्ये पोलिसांकडून रहिवाशांना 'ट्रॅफिक बडी' चॅटबॉटचा वापर शिकविला जात आहे. पिंपरी चिंचवड हाउसिंग सोसायटी फेडरेशनच्या पुढाकारातून आतापर्यंत वाकडमधील रिदम, वेस्टर्न अव्हेन्यू, अक्षर एलमेंटा, संस्कृती, कल्पतरू हार्मनी मिळून सहा सोसायट्यांत ही सत्रे झाली आहेत. 'ट्रॅफिक बडी' चॅटबॉट सोपे आणि प्रभावी असून मोबाईलवरुन +९१ ८७८८६४९८८५ या व्हॉट्सअपवर क्रमांकावर काही सेकंदांत तक्रार दाखल करणे शक्य होत आहे. कल्पतरू हार्मनी सोसायटीत झालेल्या सत्रात सहाय्यक पोलिस आयुक्त सतीश नांदुरकर, सहाय्यक पोलिस निरीक्षक मधुकर थोरात, कपिल साबळे व मान्यवरांनी मार्गदर्शन केले. 'ट्रॅफिक बडी' ही सुविधा पोलिस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या संकल्पनेतून साकार झाली आहे.

> या सहज, सोप्या व्हॉट्स ॲपबेस चॅटबॉटद्वारे नागरिकांना आपल्या विविध वाहतूक समस्या तत्काळ सोडविता येत आहेत. आजवर हजारो तक्रारींचे आम्ही निवारण केले आहे.
> **-- मधुकर थोरात,** सहायक पोलिस निरीक्षक, वाकड वाहतूक विभाग.

> हा उपक्रम यशस्वी करण्यासाठी पोलिसांचे मार्गदर्शन मौल्यवान ठरले. आम्ही इतर सोसायट्यांनाही अशी सत्रे आयोजित करण्याचे आवाहन करतो. शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी समाजातील विविध घटकांची साथ अतिशय महत्त्वाची आहे.
> **-विकास बाबर,** अध्यक्ष, कल्पतरू हार्मोनी सोसायटी.

### असे आहे 'ट्रॅफिक बडी'

- जिओ फेन्सिंगद्वारे 'ट्रॅफिक बडी' चॅटबॉटची रचना
- शहरातील १४ वाहतूक विभागांचा समावेश
- ज्या त्या भागातील तक्रार संबंधित विभागालाच प्राप्त होते
- त्यानुसार पुढील कार्यवाही तत्काळ केली जाते.
- वाहतूक अडचणी, पार्किंगची गैरसोय, नियमभंग याबाबत सोप्या पद्धतीने तक्रार नोंदवणे शक्य.

### अशी करता येईल तक्रार


- फक्त 'HI' असा मेसेज पाठवा आणि पुढील निर्देशांचे पालन करा
- आपले नाव व भाषा सांगून (माहिती गोपनीय) तक्रार नोंदवा
- वाहतूक नियमांचे उल्लंघन, वाहतूक कोंडी, अनियमितता, रस्त्याचे नुकसान, बेकायदेशीर पार्किंग, सिग्नल समस्या, आपला सल्ला, जड वाहनांकडून नियमभंग या पर्यायांपैकी आवश्यक पर्याय निवडा
- तक्रार ऑनलाइन नोंदवून पोचपावती,

# निवडणूक आयोगाच्या पटांगणात हुतुतू




**आचारसंहिता भंगाच्या प्रकरणांमध्ये आयोगाने अधिक कठोर भूमिका घेतली पाहिजे असे लोकांना वाटत असेल; पण प्रत्यक्षात आयोगाचा वापर 'बफर' म्हणून सुरू झाला आहे..**

यंदाच्या लोकसभा निवडणुकीत लाट सोडूनच द्या, राजकीय पक्षांकडे एकमेकांविरोधात लढायला खणखणीत मुद्दादेखील नाही. काँग्रेसला जेवढ्या जागा मिळतील त्यावर ते समाधानी राहतील. प्रश्न भाजपचा आहे, पंतप्रधान नरेंद्र मोदींनी ४०० जागांच्या विजयाची भीमगर्जना केली होती. आता त्याचे काय करायचे या विवंचनेत भाजपचे नेते आहेत. मोदींनीच जर काही चमत्कार केला तर 'चारसो पार' जागा मिळतील. दोन टप्प्यांतील मतदान झालेले असून मोदींनी सर्व मुद्दे हाताळून पाहिले आहेत. रामाचा मुद्दा प्रभावी ठरलेला नाही, काँग्रेस आणि त्यांच्या घराणेशाहीचा मुद्दा इतक्या वेळा वापरला आहे की तो बोथट होऊ लागला आहे. भ्रष्टाचाराच्या मुद्द्यावरही बोलून झाले आहे. मग आता करायचे काय, असे म्हणत असताना भाजपने काँग्रेसच्या जाहीरनाम्यात उल्लेख नसलेल्या 'संपत्तीच्या फेरवाटपा'चा मुद्दा घेऊन जमीन धोपटायला सुरुवात केली आहे. हे सगळे प्रकरण केंद्रीय निवडणूक आयोगाकडे जाणार हे भाजपलाही माहीत होते. तरीही मोदींनी काँग्रेसच्या कथित मुस्लीम अनुनायावरून प्रचार सभेत ध्रुवीकरणाच्या सोंगट्या फेकल्या. दोन




टप्प्यांतील मतदानानंतर केंद्रीय निवडणूक आयोगाच्या पटांगणात लोकसभा निवडणूक खेळली जाणार असे वाटू लागले आहे. निवडणुकांमध्ये आक्षेपार्ह विधाने करून एकमेकांवर हल्लाबोल करायचा, मग निवडणूक आयोगात एकमेकांविरोधात धाव घ्यायची आणि आयोगाचा 'बफर' म्हणून वापर करायचा असा प्रकार सुरू झालेला आहे.गेल्या काही वर्षांमध्ये केंद्रीय निवडणूक आयोगावर वेगवेगळ्या प्रकारचा दबाव वाढत गेल्याचे पाहायला मिळाले होतेच. २०२४च्या लोकसभा निवडणुकीत यापेक्षा वेगळे काय होत आहे, असा प्रश्न विचारता येऊ शकतो. २०१९ची लोकसभा निवडणूक, त्यानंतर सहा महिन्यांनी झालेली २०२० मधील दिल्ली विधानसभेची निवडणूक आणि आता २०२४ची लोकसभा निवडणूक या तीनही निवडणुकांनंतर आचारसंहितेच्या भंगाबाबत आयोगाच्या हस्तक्षेपाची लोकांची अपेक्षा वाढत गेली आहे. दोन आठवड्यांपूर्वी दिल्लीत माजी केंद्रीय निवडणूक आयुक्त अशोक लवासांनी निवडणूक प्रक्रियेसंदर्भात मते मांडली होती. आयोगाने 'सुपरमॅन' व्हावे असे लोकांना वाटते; पण प्रत्यक्षात तसे होत नाही. आयोगाला संतुलित भूमिका घ्यावी लागते. तसे झाले तर निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास कमी होण्याचा धोका असतो, असे लवासा यांचे म्हणणे होते. २०१९ मधील लोकसभेची निवडणूक लवासांनी अत्यंत जवळून पाहिली असल्याने त्यांचे म्हणणे योग्य म्हणता येईल. पण ही निवडणूक आयोगाची मर्यादाही ठरते. त्याचा गैरफायदा राजकीय पक्षांकडून घेतला जात आहे.राजस्थानच्या प्रचार सभेत मोदींनी हिंदू मतदारांना मतांचे साकडे घातले. काँग्रेस हा मुस्लिमांचा अनुनय करणारा पक्ष असून हिंदूंची संपत्ती हडप करण्याचा काँग्रेसचा इरादा असल्याचे मोदी म्हणाले. त्यानंतर धर्माच्या आधारावर खोटेनाटे आरोप करणे आचारसंहितेचा भंग ठरतो, असा आरोप काँग्रेसने केला आणि मोदींविरोधात काँग्रेसने निवडणूक आयोगाकडे तक्रार दाखल केली. तशी तक्रार दाखल होऊ शकते याचा अंदाज भाजपला नसेल असे कोणीही म्हणू शकत नाही. आपल्याविरोधात लेखी तक्रार केली जाऊ शकते हे माहीत असूनदेखील मोदींनी आक्षेपार्ह विधान केले. तिसऱ्या टप्प्यातील मतदानापासून निवडणूक उत्तरेकडे सरकू लागेल. तेव्हा तर अशा विधानांची तीव्रता आणखी वाढू शकेल. उत्तर प्रदेश, राजस्थान अशा काही राज्यांमध्ये भाजपला ध्रुवीकरणाचा फायदा मिळतो. राजस्थानच्या विधानसभा निवडणुकीत तिजारा मतदारसंघ मुस्लीमबहुल असतानादेखील भाजपचे बाबा बालकनाथ विजयी झाले. उत्तर प्रदेशच्या विधानसभा निवडणुकीमध्ये समाजवादी पक्षाने ओबीसी एकीकरणाचे गणित मांडून देखील 'यादव- मुस्लीम' समीकरणामुळे भाजपलाच प्रचंड यश मिळाले. या वेळी लोकसभा निवडणुकीत भाजपला लोकांना आकर्षित करणारा टोकदार मुद्दा मिळालेला नव्हता. संपत्तीच्या फेरवाटपाच्या मुद्द्याचा फुगा हवेत उडवून ध्रुवीकरणाच्या आधारावर भाजप टिकाव धरू पाहात आहे.

## संपादकीय »

### विद्वेषवृक्षाची विषफळे!

***हे असे कृत्य शेवटचे ठरावे अशी इच्छा सर्व सद्विचारींची असली तरी तसे होणे कठीण; कारण काही मोजक्या मुसलमानांच्या मनातून देशविरोधी भावना गेलेली नाही..***

राजधानी दिल्लीतील बॉम्बस्फोट हे आपली सामाजिक आणि आंतरराष्ट्रीय डोकेदुखी वाढवणारे ठरतात. या स्फोटांमागे निश्चित कोणाचा हात आहे हे लगेच स्पष्ट करण्यात आले नाही. बिहार विधानसभा निवडणुकीतील मतदानावर परिणाम नको म्हणून सरकारने या बॉम्बस्फोटाबाबत भाष्य करणे टाळले असावे. तसे असेल तर ते सरकार प्रौढ होत असल्याचे लक्षण मानता येईल. असो. परंतु तीन डॉक्टरांसह आठ जणांस अटक आणि सुमारे तीन टन स्फोटके तीन राज्य पोलिसांच्या संयुक्त कारवाईत जप्त केली गेली आणि थोड्या वेळाने हा बॉम्बस्फोट झाला. अर्थातच हे सर्व मुसलमान होते. दहशतवादविरोधी कारवाई जम्मू-काश्मीर, हरियाणा आणि उत्तर प्रदेश अशा तीन राज्यांत झाली; पण त्यात पकडले गेलेले हे पारंपरिक दहशतवादी म्हणता येणार नाहीत. अर्थात तूर्त हे सारे संशयित आहेत हे खरे.

'सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार पदपथ अतिक्रमणमुक्त करा' असा आदेश राज्यातील सर्व महानगरपालिकांना देण्याची वेळ राज्य शासनाच्या नगरविकास विभागावर आली आहे. वास्तविक रस्ते, पदपथांवर मोकळे ठेवणे हे महापालिकांचे कर्तव्य.

# न्यायपालिका, सरकारही पदपथांवर 'पायदळी'च?

पण सर्वच स्थानिक स्वराज्य संस्थांकडून त्यात कसूर केली जात असल्यानेच सर्वोच्च न्यायालयाला छडी हाती घ्यावी लागली. महापालिकांना हा आदेश देताना, पदपथ हा नागरिकांचा मूलभूत अधिकार असल्याचेही न्यायालयाने अधोरेखित केले. सर्वोच्च न्यायालयाने राज्यांना पुढील सहा महिन्यांत पदपथांबाबत नियमावली तयार करण्याची सूचनाही केली होती. यानुसार महाराष्ट्राने १४ कलमी नियमावली तयार केली आहे. राज्यातील सर्व महानगरपालिकांनी वार्षिक अंदाजपत्रकात एक टक्का निधी हा 'रस्ते सुरक्षा, वाहतूक शिस्त आणि जनजागृती उपक्रमांसाठी राखीव' ठेवण्याची सक्त सूचना करण्यात आली आहे. या निधीसाठी स्वतंत्र लेखाशीर्ष उघडण्यासही पालिकांना सांगण्यात आले आहे.बाजारपेठा, मुख्य रस्ते, बसस्थानके, शाळा-महाविद्यालयांचा परिसर, गर्दीची ठिकाणे येथील पदपथांचे दर सहा महिन्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील नोंदणीकृत



लेखापरीक्षण संस्थांकडून परीक्षण करण्याची अट घालण्यात आली आहे. या अहवालानुसार महापालिकांना पदपथांमध्ये सुधारणा किंवा दुरुस्ती करावी लागेल. पादचारी क्रॉसिंगच्या नियमांचे पालन करावे, पदपथावरील अतिक्रमणे हटविण्यासाठी कृती आराखडा तयार करावा. अपघातप्रवण क्षेत्रे निश्चित करावीत अशा तरतुदींचा या नियमावलीत समावेश आहे. रस्ते सुरक्षेसाठी एक टक्का निधीची तरतूद अर्थसंकल्पात करण्याची तरतूद ठीकच; पण तिचा दुरुपयोग होणारच नाही याची कोणी खात्री देऊ शकत नाही. मुंबईसह मोठ्या शहरांमध्ये पदपथ सापडणे कठीण होऊ लागले आहे. रस्ते रुंदीकरणाच्या नावाखाली पदपथांची रुंदी कमी केली जाते. काही ठिकाणी तर पदपथ ही संकल्पनाच राहिलेली नाही. पुण्यासारख्या शहरांमध्ये नव्या रचनेनुसार दोनतीन रस्त्यांसाठी प्रशस्त पदपथ तयार करण्यात आले. पण त्यांवर लोकांनी चालण्यापेक्षा दुचाकींची गर्दी वाढली. पदपथ मोकळे ठेवावे, अशी सरकारची सूचना; पण सरकारचे मुख्यालय असलेल्या मंत्रालयापासून हाकेच्या अंतरावरील विधान भवनाबाहेरील पदपथ सुरक्षेच्या कारणास्तव कायमस्वरूपी बंद करण्यात आला. मंत्रालयाच्या समोरील फ्रि प्रेस मार्गावरील पदपथावर टपऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत चालली आहे. उच्चपदस्थांचा आशीर्वाद असल्याशिवाय मंत्रालयासमोर टपऱ्या उभारल्या जाणे कठीणच. विधान भवनाजवळील 'बहुमजली वाहनतळा'समोरच्याच पदपथावर वाहने उभी करण्यात येत असल्याने पादचाऱ्यांना धड चालता येत नाही. विधिमंडळ आणि मंत्रालयासमोरील पदपथांची ही अवस्था, तर अन्य रस्त्यांबाबत न बोललेलेच बरे.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**- संत तुकाराम**

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

## राज्यात हाय अलर्ट — कोल्हापूर, सिद्धिविनायक मंदिरांवर बंदोबस्त वाढवला


# राज्यात हाय अलर्ट जारी !

## प्रमुख शहरात नाकाबंदी

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळील एका कारमध्ये झालेल्या भीषण स्फोटानंतर मुंबई शहरात आणि राज्यात प्रमुख शहरात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. शहरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून खबरदारीचा इशारा आला असून शेगाव,कोल्हापूर, सिद्धिविनायक सह प्रमुख मंदिरांची सुरक्षा वाढवली आहे.**



मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी संगितले की सर्वत्र कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखा आणि एटीएसला जास्तीत जास्त नाकाबंदी आणि कोम्बिंग ऑपरेशनवर भर देण्याचे आदेश दिले आहेत. संशयित प्रत्येक व्यक्तीची कसून चौकशी करा असा आदेश वरिष्ठांकडून देण्यात आला आहे. सोमवारी सायंकाळी दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळील एका कारमध्ये भीषण स्फोट झाला होता. त्यात या कारसह आजूबाजूच्या काही कारचे प्रचंड नुकसान झाले होते. स्फोटात सात ते आठजणांचा मृत्यू, तर वीसहून अधिक लोक जखमी झाल्याचे बोलले जाते. या घटनेनंतर राष्ट्रीय तपास यंत्रणा, स्थानिक पोलीस, गुन्हे शाखेसह इतर यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली होती. दिल्लीतील स्फोटानंतर मुंबई शहरात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. शहरात कुठेही अनुचित प्रकार घडू नये, घातपात घडू नये म्हणून पोलीस सज्ज आहेत. सर्वत्र कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. शहरातील सर्व शासकीय, निमशासकीय इमारती, धार्मिक स्थळे, महत्त्वाची रेल्वे स्थानके, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय विमानतळावरील बंदोबस्तात अचानक वाढ करण्यात आली आहे. स्थानिक पोलिसांना नाकाबंदी, गस्त आणि कोम्बिंग ऑपरेशनवर भर देण्याचे आदेश देण्यात आले आहे. कुठल्याही संशयित वस्तूंना हात लावू नका, संशयित व्यक्तीची माहिती स्थानिक पोलिसांना द्यावी असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले. मुंबई पोलिसांसह रेल्वे पोलिसांना सतर्कचा इशारा देण्यात आला आहे. शहरातील सर्वच मुख्य रेल्वे स्थानकांवरील बंदोबस्तात वाढ करण्यात आली आहे. संशयित प्रवाशांची चौकशी केली जात आहे. त्यांच्याकडील सामानाची श्वान पथकाच्या मदतीने तपासणी केली जात आहे. कुठल्याही अफवांवर विश्वास न ठेवता मुंबईकरांनी मुंबई पोलिसांच्या मुख्य नियंत्रण कक्षाशी संपर्क साधावा असे आवाहन पोलिसांकडून करण्यात आले आहे. दुसरीकडे मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी, खबदारीचा इशारा देण्यात आला असून बंदोबस्तात वाढ करण्यात आल्याचे सांगितले.दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळील एका कारमध्ये झालेल्या भीषण स्फोटानंतर मुंबई शहरात आणि राज्यात प्रमुख शहरात हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. शहरात कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून खबरदारीचा इशारा आला असून शेगाव,कोल्हापूर, सिद्धिविनायक सह प्रमुख मंदिरांची सुरक्षा वाढवली आहे. मुंबईचे पोलीस आयुक्त देवेन भारती यांनी संगितले की सर्वत्र कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला असून स्थानिक पोलिसांसह गुन्हे शाखा आणि एटीएसला जास्तीत जास्त नाकाबंदी आणि कोम्बिंग ऑपरेशनवर भर देण्याचे आदेश दिले आहेत. संशयित प्रत्येक व्यक्तीची कसून चौकशी करा असा आदेश वरिष्ठांकडून देण्यात आला आहे. सोमवारी सायंकाळी दिल्लीतील लाल किल्ला मेट्रो स्टेशनजवळील एका कारमध्ये भीषण स्फोट झाला होता. त्यात या कारसह आजूबाजूच्या काही कारचे प्रचंड नुकसान झाले होते. स्फोटात सात ते आठजणांचा मृत्यू, तर वीसहून अधिक लोक जखमी झाल्याचे बोलले जाते. या घटनेनंतर राष्ट्रीय तपास यंत्रणा, स्थानिक पोलीस, गुन्हे शाखेसह इतर यंत्रणेतील अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली होती.

### सरकारचे अपयश - पटोले

देशाची राजधानी असलेल्या दिल्ली शहरात अत्यंत मोक्याच्या ठिकाणी हा स्फोट होणे हे सरकारचे आणि गुप्तचर यंत्रणांचे मोठे अपयश असून मोदी यांच्या नेतृत्वात हा देश आणि सामान्य माणूस सुरक्षित नाही हे सिद्ध झाले असल्याची प्रतिक्रिया काँग्रेसचे नेते आ. नाना पटोले यांनी व्यक्त केली आहे.

## नगराध्यक्षपदासाठी माजी नगराध्यक्ष इच्छुक

# निवडणुकीत महायुती अन् महाआघाडीही अशक्य

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कराड नगरपालिकेच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी भाजपने घेतलेल्या इच्छुकांच्या मुलाखतीत माजी नगराध्यक्ष शारदा जाधव व जयवंत पाटील यांच्यासह मातब्बर १५ जणांचा समावेश आहे. गतखेपेला भाजपचा नगराध्यक्षपदाचा उमेदवार निर्णायक मतांनी निवडून आला होता.**

तर, वर्षभरापूर्वीच्या विधानसभा निवडणुकीत भाजपचे डॉ. अतुल भोसले मोठ्या मताधिक्याने जिंकल्याने सध्या भाजपची चलती असून, उमेदवारांच्या निवडी करणे व्यक्तिगत आमदार डॉ. भोसलेंसाठी मोठे आव्हान ठरणार आहे.‘कराड उत्तर’मधून २००४ सालच्या विधानसभा निवडणुकीत अपक्ष म्हणून थोडक्या मतांनी विजश्री हुकलेले अरुण जाधव, ज्येष्ठ नगरसेवक विनायक पावसकर, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपचे स्थानिक ज्येष्ठ नेते घन:श्याम पेंढारकर हेही भाजपकडून नगराध्यक्षपदासाठी इच्छुक आहेत.कराड नगरपालिकेचे नगराध्यक्षपद तब्बल तीन दशकांनंतर खुल्या प्रवर्गाला मिळाल्याने मिनी आमदारकी म्हणून संधी असलेल्या या प्रतिष्ठेच्या खुर्चीसाठी कसदार




पहिलवान आखाड्यात उतरलेत. नगराध्यक्ष आणि ३० नगरसेवकांसाठीची निवडणूक महायुती विरुध्द महाविकास आघाडी या एकजुटीने लढतील का? असा प्रमुख प्रश्न असतानाच दोन्हीकडील स्थानिक नेते व कार्यकर्त्यांची महत्त्वाकांक्षा पाहता सध्या तरी, भक्कम महायुती अन् मजबूत महाविकास आघाडी असे चित्र नाही. त्यामुळे अनेक ठिकाणी मैत्रीपूर्ण लढती होतील असे आजमितीला तरी म्हणावे लागत आहे. काँग्रेसनेही ताकदीने निवडणूक लढवण्याचे रणशिंग फुंकले आहे. मात्र, त्यांची रणनीती स्पष्ट होत नसून, त्यांना मर्यादित प्रतिसाद मिळत असल्याचे दिसते आहे.शिवसेनेकडून (एकनाथ शिंदे गट) माजी उपनगराध्यक्ष राजेंद्र यादव यांची नगराध्यक्षपदाची उमेदवारीच संपर्क नेत्यांनी आयोजित कार्यकर्ता मेळाव्यात जाहीर केली आहे. तर, दुसरीकडे याच शिवसेनेचे आणि उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचे निकटवर्तीय रणजित पाटील हे बंडखोरी करतात किंवा काय हे सुध्दा तितकेचे महत्त्वाचे मानले जात आहे. माजी सहकारमंत्री बाळासाहेब पाटील यांचे पुतणे सौरभ पाटील किंवा बंधू सुभाष पाटील यापैकी एकाचे नाव अंतिम होईल असे मानले जात आहे.

### आघाडी एकजुटीने लढतील

एकूणच या निवडणुकीत भाजपचा बोलबाला असून, भाजपचे अधिकृत उमेदवार व राजेंद्र यादव तसेच बाळासाहेब पाटील देतील तो (शरद पवार गट) उमेदवार यांच्यातच तिरंगी लढत रंगेल असे सध्याचे चित्र आहे. नगराध्यक्ष आणि ३० नगरसेवकांसाठीची निवडणूक महायुती विरुध्द महाविकास आघाडी या एकजुटीने लढतील का?

## महाआघाडी पिछाडीवर! प्रशांत किशोर फॅक्टर जबाबदार?

# बिहारमध्ये 'एक्झिट पोल'चा कौल NDAला

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**बिहारमध्ये विधानसभा निवडणुकीसाठी दोन्ही टप्प्यातील मतदान पार पडले आहे. या निवडणुकीसाठी मतदानाचा पहिला टप्पा ६ नोव्हेंबर रोजी पार पडला, तर ११ नोव्हेंबर रोजी दुसऱ्या टप्प्यातील मतदान पूर्ण झाले आहे. यानंतर सर्वत्र बिहार निवडणुकीत कोणाला यश मिळणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यादरम्यान संभाव्य निकालाचे एक्झिट पोल समोर आले आहेत.**

## महाआघाडीची कामगिरी निराशाजनक




एक्झिट पोलमध्ये, विरोधी पक्षांच्या महाआघाडीची कामगिरी ही निराशाजनक दाखवण्यात आली आहे. या अंदाजांमध्ये त्यांना २०२० मध्ये मिळालेल्या ११० जागांपेक्षा खूपच कमी जागा मिळतील, असे दर्शवले आहे. यानुसार सर्वाधिक फटका हा लालू यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाला बसण्याची शक्यता आहे. विशेष बाब म्हणजे हा पक्ष मागच्या वेळी सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला होता. यंदाच्या निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष बनण्याचा मान भाजपाला मिळेल, असे दिसून येत आहे. लक्षात घेण्याची बाब म्हणजे हे एक्झिट पोल हे बहुतांश वेळा चुकीचे ठरले आहेत. विशेषतः बिहारच्या निवडणुकांबाबत हे अंदाज अनेकदा चुकल्याचे पाहायला मिळाले आहे.यावेळी दैनिक भास्कर, मॅट्रीझ, पीपल्स इनसाइट, चाणक्य स्ट्रॅटेजीज आणि पीपल्स पल्स यांसह सर्व प्रमुख एक्झिट पोल्सनी भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएच्या विजयाचा अंदाज वर्तवला आहे. या अंदाजानुसार, एनडीएला १३० ते १६७ च्या दरम्यान जागा मिळतील, तर महाआघाडीला ७३ ते १०८ च्या दरम्यान जागा मिळतील, असे म्हटले आहे.एकंदरीत एक्झिट पोल्समध्ये सत्ताधारी एनडीएला १४६ जागा आणि महाआघाडीला ९० जागा मिळतील, असा अंदाज वर्तवला गेला आहे.निवडणूक रणनीतीकार जे पुढे राजकारणात उतरले त्या प्रशांत किशोर यांचा जन सुराज पक्ष हा या निवडणुकीत मोठा एक्स फॅक्टर ठरेल असे मानले जाते होते, मात्र या एक्झिट पोलनुसार त्यांचा फारसा फरक पडणार नाही असा अंदाज दिसून येत आहे.जन सुराज पक्ष जेमतेम त्याचे खाते उघडू शकेल, तर पक्षाला शून्य ते पाच जागा मिळतील असा अंदाज व्यक्त केला जात आहे. या पक्षाला मिळणाऱ्या जागांची संख्या ही सरासरी २ इतकी आहे. पण इतक्या कमी जागा मिळाल्या असल्या तरीही या पक्षाने विरोधी पक्षाच्या महाआघाडीची मते खाल्ली असण्याची शक्यता आहे, ज्यामुळे ही महाआघाडी ही निवडणुकीत एनडीएच्या खूप मागे पडली असण्याची शक्यता आहे.

## एक्झिट पोल बहुतांश चुकीचे

यंदाच्या निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष बनण्याचा मान भाजपाला मिळेल, असे दिसून येत आहे.लक्षात घेण्याची बाब म्हणजे हे एक्झिट पोल हे बहुतांश वेळा चुकीचे ठरले आहेत. विशेषतः बिहारच्या निवडणुकांबाबत हे अंदाज अनेकदा चुकल्याचे पाहायला मिळाले आहे.यावेळी दैनिक भास्कर, मॅट्रीझ, पीपल्स इनसाइट, चाणक्य स्ट्रॅटेजीज आणि पीपल्स पल्स यांसह सर्व प्रमुख एक्झिट पोल्सनी भाजपाच्या नेतृत्वाखालील एनडीएच्या विजयाचा अंदाज वर्तवला आहे. या अंदाजानुसार, एनडीएला १३० ते १६७ च्या दरम्यान जागा मिळतील.

एक्झिट पोलच्या अंदाजानुसार, महाआघाडीमधील घटक पक्षांची वैयक्तिक कामगिरी देखील घटली आहे. सर्व पक्षांचे सविस्तर आकडे उपलब्ध नसले तरी, एक्झिट पोलनुसार राष्ट्रीय जनता दल (RJD) आणि काँग्रेस या दोन्ही पक्षांची कामगिरी खराब झाली आहे. एक्झिट पोलनुसार, आरजेडीला ५७ आणि ६९ च्या दरम्यान जागा मिळतील, या पक्षाला गेल्या निवडणुकीत ७५ जागा मिळाल्या होत्या. तर काँग्रेसला ११ ते १४ जागांवर समाधान मानावे लागेल असा अंदाज आहे, काँग्रेसला गेल्या निवडणुकीत १९ जागा मिळाल्या होत्या.भाजपाला ६७ आणि ७० च्या दरम्यान जागांवर विजय मिळेल. ज्यामुळे भाजपा राज्यात सर्वात मोठा पक्ष ठरेल. तरीही भाजपा आरजेडीने गेल्यावेळी मिळवलेल्या जागांच्या खूपच मागे राहाणार आहे.

मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या जनता दल युनायटेड पक्षाची कामगिरी गेल्या निवडणुकीपेक्षा अधिक चागली होण्याची अपेक्षा आहे. गेल्या निवडणुकीत पक्षाने ४३ जागा जिंकल्या होत्या, यंदा तो ५८ आणि ७१ याच्या दरम्यान जागा जिंकेल असा अंदाज आहे. एक्झिट पोलमध्ये, विरोधी पक्षांच्या महाआघाडीची कामगिरी ही निराशाजनक दाखवण्यात आली आहे. या अंदाजांमध्ये त्यांना २०२० मध्ये मिळालेल्या ११० जागांपेक्षा खूपच कमी जागा मिळतील, असे दर्शवले आहे. यानुसार सर्वाधिक फटका हा लालू यादव यांच्या राष्ट्रीय जनता दलाला बसण्याची शक्यता आहे. विशेष बाब म्हणजे हा पक्ष मागच्या वेळी सर्वात मोठा पक्ष म्हणून उदयास आला होता.


# इंजिनिअरला महिलेने अंमली पदार्थ देऊन लुटलं

## सोन्याचे दागिने, हेडसेट आणि रोख रक्कम घेऊन झाली पसार

। मुंबई ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**एका २६ वर्षांच्या इंजिनिअरला अंमली पदार्थ देऊन लुटल्याची घटना समोर आलली आहे. डेटिंग ॲपवर भेटलेल्या महिलेने भेटायला आल्यानंतर या इंजिनिअरला अंमली पदार्थ मद्यातून दिले. त्याला गुंगी आल्यानंतर त्याचे पैसे आणि सोनं घेऊन महिला पसार झाली. ही घटना बंगळुरु या ठिकाणी घडली आहे. ही घटना १ नोव्हेंबरला घडली. मात्र इंजिनिअरने जेव्हा या प्रकरणी तक्रार दाखल केली तेव्हा प्रकाशात आली आहे.**

बंगळुरु पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कविप्रिया नावाच्या एका महिलेने डेटिंग ॲपवर भेट झालेल्या इंजिनिअरला भेटायला बोलवलं होतं. मागील दोन महिन्यांपासून हे दोघंही ऑनलाइन एकमेकांशी संवाद साधत होते. यानंतर या दोघांनी भेटायचं असं ठरवलं. १ नोव्हेंबरला ही घटना घडली. इंदिरानगर या ठिकाणी एक रेस्तराँ आहे त्या ठिकाणी ही भेट ठरली होती. या ठिकाणी दोघांनी मद्य सेवन केलं, जेवण केलं. त्यानंतर हे दोघंही क्रिस्टल हाइट्स या ठिकाणी लॉजवर गेले. महिलेनेच ही रुम बुक केली होती. या महिलेने सांगितलं की ती एका ठिकाणी पीजी म्हणून राहते. त्या ठिकाणी तिने हे सांगितलं आहे



की ती आज येणार नाही.कवीप्रिया नावाची महिला त्या इंजिनिअरला रुमवर घेऊन गेली. साधारण १२.३० च्या सुमारास त्यांनी जेवण मागवलं होहंत. त्यानंतर या महिलेने इंजिनिअरला पाणी प्यायला दिलं. पाणी प्यायल्यानंतर या इंजिनिअरला झोप लागली. सकाळी जेव्हा या इंजिनिअरला जाग आली तेव्हा त्याला कळलं की कविप्रिया तिथून पसार झाली आहे. तिने जाताना सगळ्या मौल्यवान वस्तू आणि पैसे घेऊन पोबारा केला आहे.इंजिनिअरने

## काय घेऊन पसार झाली महिला?

आणि या प्रकरणी तपास सुरु असल्याचंही सांगितलं आहे. इंडियन एक्स्प्रेसने हे वृत्त दिलं आहे.एका २६ वर्षांच्या इंजिनिअरला अंमली पदार्थ देऊन लुटल्याची घटना समोर आलली आहे. डेटिंग ॲपवर भेटलेल्या महिलेने भेटायला आल्यानंतर या इंजिनिअरला अंमली पदार्थ मद्यातून दिले. त्याला गुंगी आल्यानंतर त्याचे पैसे आणि सोनं घेऊन महिला पसार झाली.

दिलेल्या माहितीनुसार ३ लाख २२ हजारांची सोन्याची चेन, ३० ग्रॅमचं सोन्याचं ब्रेसलेट ज्याची किंमत ३ लाख ४५ हजार आहे. १० हजारांची रोख रक्कम आणि १२ हजार रुपयांचा हेडसेट असं सगळं घेऊन ती पसार झाली. पोलिसांनी सांगितलं की इंजिनिअरने या घटनेनंतर महिलेला त्याने फोन लावण्याचा प्रयत्न केला. पण तिचा फोन सातत्याने स्विच ऑफ लागत होता. तरीही त्याने दोन दिवस वाट पाहिली. यानंतर या इंजिनिअरला ही भीती वाटली की त्याचे प्रायव्हेट फोटो तर काढले नाहीयेत ना? यानंतर त्याने थेट पोलीस ठाणं गाठलं आणि तक्रार नोंदवली. पोलिसांनी कलम ३०३ (२) आणि कलम ३१८ (४) या अन्वये गुन्ह्याची नोंद केली आहे .

# आदित्यच्या मनात सागरविरोधात तिरस्कार भरला; सावनीचं षडयंत्र

'प्रेमाची गोष्ट'च्या आजच्या एपिसोडमध्ये आदित्यच्या बर्थ डे पार्टीत मेलोड्रामा दिसणार आहे. आदित्यने बर्थ डे पार्टीला आमंत्रित केल्यानंतर सागर प्रचंड आनंदी आहे. सई आणि मुक्तासोबत सागर आदित्यच्या बर्थ डे पार्टीत जाण्यासाठी सज्ज आहे. सागर सईला आदित्यबद्दल सांगतो. आदित्य आपल्यासोबत का राहत नाही असे सई विचारते. त्यावर सागर अनुत्तरीत होतो. तर, दुसरीकडे मुक्ता स्वाती आणि तिच्या नवऱ्याला मदत करण्यासाठी पावले उचलते.स्वाती आणि तिच्या नवऱ्याला मदत करण्याचे आश्वासन मुक्ता देते. स्वातीच्या नवऱ्याकडे एक महिला 15 लाखांची मागणी करते. त्यासाठी पैसे देण्याचे आश्वासन मुक्ता देते. त्यासाठी आपले दागिने विकण्याचा विचार करत असते. त्यासाठी मुक्ता सासू इंद्राकडे तिजोरीच्या चाव्या मागते. त्यावेळी इंद्रा तिला दागिने काढण्यासाठी तिजोरीच्या चाव्यांचा जुडगा देते. त्यावेळी इंद्रा मुक्ताला म्हणते की, हा जुडगा तुझ्या हाती येईल पण हा तुला कमवावा लागेल. जसा मी माझ्या सासूकडून कमवला.



सागरने आदित्यच्या बर्थ डे पार्टीतसोबत येण्याचा आग्रह धरल्याने मुक्ताने स्वातीला आपण उशिरा येणार असल्याचे सांगितले. सागर दुखावेल अशी कोणतीही जोखीम मुक्ता घेत नाही, स्टार प्रवाहवरील 'प्रेमाची गोष्ट' मालिका आता रंजक वळणावर आहे. सावनीकडून आता सागर-मुक्ताच्या संसारात आग लावण्याचे प्रयत्न सुरू आहेत. सावनीने लहान आदित्यच्या मनात सागरबद्दल तिरस्कार भरला आहे. आदित्यच्या बर्थ डे पार्टीत आलेल्या मुक्ताला सावनी उपदेशाचे धडे देत तुला कोणीही आमंत्रित केले नाही, तरी कशी आलीस असा प्रश्न करते. आमंत्रणाशिवाय मी कुठेच गेली नसती असेही सावनी म्हणते. सावनीच्या या शाब्दिक वारानंतर मुक्ताही पलटवार करते.

आजच्या एपिसोडमध्ये सावनी आणि मुक्तामध्ये काय वाद होणार, मुक्ता सावनीवर शाब्दिक पलटवार कसा करणार, आदित्य आपल्या बर्थ डे पार्टीत सागर-मुक्ता आणि सईला पाहून कसा रिएक्ट होणार, आदींची प्रश्ने आजच्या एपिसोडमध्ये मिळतील.

## मृणाल ठाकूरचा खुलासा !

'सिता रामम', 'हाय नन्ना' अशा चित्रपटांतून आपल्या अभिनयाचा ठसा उमटवणारी मृणाल ठाकूर ही आताच्या घडीची लोकप्रिय अभिनेत्री आहे. दाक्षिणात्य, तसेच बॉलीवूड सिनेसृष्टीतही तिच मोठे योगदान आहे. कमी काळातच प्रसिद्धीझोतात आलेली ही अभिनेत्री सोशल मीडियावरही तितकीच सक्रिय असते. बॉलिवूडमध्येही वेगवेगळ्या चित्रपटातून मृणालने स्वतःचं वेगळं स्थान निर्माण केलं आहे. नुकतंच मृणालने तिला आलेल्या एका विचित्र अनुभवाबद्दल खुलासा केला आहे. मृणाल ही फार सेक्सी दिसत नाही म्हणून एका दिग्दर्शकाने तिला रिजेक्ट केलं असल्याचा खुलासा तिने केला होता. यानंतर मृणालने त्या दिग्दर्शकाला किमान लुक टेस्ट घेण्याची विनंती केली. नंतर त्या दिग्दर्शकाने मृणालची माफीही मागितली. पण याआधीही अशा प्रकारे बऱ्याचदा तिच्या शरीराबद्दल भाष्य केलं गेलं असल्याचा खुलासाही तिने केला. इतकंच नव्हे तर बऱ्याचदा मृणालला वजन कमी करण्याचा सल्लादेखील देण्यात आला होता.मृणालने एका गाण्यात काम करणार होती. मृणालच्या मांड्या फार जाड आहेत अन् त्यामुळे त्या गाण्यासाठी तिने तिच्या मांड्यांवरील अतिरिक्त मांस कमी करण्याचा सल्ला तिला देण्यात आला होता.

## पुन्हा वरुण आणि जान्हवी जोडी

अभिनेता वरुण धवन आणि अभिनेत्री जान्हवी कपूर बॉलीवूडमधील लोकप्रिय कलाकार आहेत. २०२३ च्या 'बवाल' चित्रपटानंतर वरुण धवन आणि जान्हवी कपूरची जोडी पुन्हा एकदा पाहायला मिळणार आहे. धर्मा प्रोडक्शनच्या 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी'या आगामी चित्रपटाद्वारे दोघेही प्रेक्षकांच्या भेटीस लवकरच येणार आहेत. या प्रेमकथेची निर्मिती करण जोहर करणार आहे.२२ फेब्रुवारीला धर्मा प्रोडक्शनच्या अधिकृत इन्स्टाग्राम अकाउंटवर 'सनी संस्कारी की तुलसी कुमारी' या आगामी चित्रपटाची घोषणा जाहीर झाली. या चित्रपटाचे दिग्दर्शन शशांक खेतान करणार आहे. 'हम्प्टी शर्मा की दुल्हनिया', 'बद्रीनाथ की दुल्हनिया' आणि 'धडक' यासह त्याने वरुण धवन आणि जान्हवी कपूरचे अनेक चित्रपट दिग्दर्शित केले आहेत.या चित्रपटाच्या घोषणेची पोस्ट शेअर करत त्यात कॅप्शन लिहिले होते की, "तुमचा 'सनी संस्कारी' 'तुलसी कुमारी'ला मिळवण्याच्या मार्गावर आहे! मनोरंजनाने गुंफलेली ही प्रेमकथा मोठ्या पडद्यावर लवकरच येत आहे!"'सनी संस्कारी की तुलसी कुमारी' १५ एप्रिल २०२५ रोजी चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात वरुण 'सनी संस्कारी'ची मुख्य भूमिका साकारणार आहे तर जान्हवी 'तुलसी कुमारी'ची भूमिका साकारणार आहे. याची निर्मिती करण जोहर, हिरू यश जोहर, अपूर्व मेहता आणि शशांक खेतान यांनी केली आहे.दरम्यान वरुण धवन आणि जान्हवी कपूर यांनी २०२३ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'बवाल' या चित्रपटासाठी पहिल्यांदा एकत्रित काम केले होते.अभिनेता वरुण धवन आणि अभिनेत्री जान्हवी कपूर बॉलीवूडमधील लोकप्रिय कलाकार आहेत. २०२३ च्या 'बवाल' चित्रपटानंतर वरुण धवन आणि जान्हवी कपूरची जोडी पुन्हा एकदा पाहायला मिळणार आहे.



## माधुरीच्या लेकाचा खास किस्सा!

९० च्या दशकातील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून माधुरी दीक्षितला ओळखलं जातं. सध्या 'डान्स दीवाने' या रिॲलिटी शोमध्ये ती परीक्षकाची भूमिका निभावत असल्याचं पाहायला मिळत आहे. या शोचं सूत्रसंचालन भारती सिंह करत आहे. नुकत्याच प्रदर्शित झालेल्या एका भागात भारतीने माधुरी व मलायका अरोराच्या मुलाबद्दल एक खास आठवण सांगितली आहे.भारतीने करण जोहर दिग्दर्शित 'रॉकी और रानी की प्रेम कहानी' या चित्रपटात खास कॅमिओ केला होता. या चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान माधुरीचा लेक अरिन आणि अरबाज-मलायका यांचा मुलगा अरहान चित्रपटाच्या सेटवर सहायक म्हणून काम करत होते. याबद्दलची खास आठवण भारतीने 'डान्स दीवाने'मध्ये सांगितली.भारती म्हणाली, "मी करण सरांबरोबर नुकताच एक चित्रपट केला. यामध्ये तुमचा (माधुरी) लेक करण सरांना असिस्ट करत होता. कट झाल्यावर त्याला खुर्च्या आणायला सांगितल्या. मी आणि हर्ष त्याच्यावर बसलो. तेवढ्यात ही दोन मुलं आम्हाला हातातल्या पंख्याने वारा घालू लागली. तेवढ्यात करण सर आले आणि म्हणाले, तुम्ही या दोघांना भेटलात का? हा माधुरी मॅडमचा मुलगा आहे आणि हा मलायकाचा. ते शब्द ऐकून मी लगेच त्याच्या हातातून पंखा काढून घेतला."भारती पुढे म्हणाली, "खरंतर ही सुपरस्टार्सची मुलं आहेत. त्यामुळे कोणत्याही मोठ्या पदावर ही मुलं काम करू शकली असती. पण, असं न करता त्यांनी सेटवर सगळी कामं केली. मला त्या क्षणाला दोघांचाही खूप जास्त अभिमान वाटत होता. मी थक्क झाले होते. तुम्ही खूप चांगले पालक आहात. मी सुद्धा त्यादिवशी खूप काही शिकले." दरम्यान, माधुरी दीक्षित व डॉ. श्रीराम नेने यांना अरिन नेने आणि रायन नेने अशी दोन मुलं आहेत.



## बॉलीवूड अभिनेत्री श्रद्धा कपूर झाली आत्या!

बॉलीवूड अभिनेत्री श्रद्धा कपूरचा मावस भाऊ प्रियांक शर्मा आणि त्याची पत्नी शाझा मोरानी आई-बाबा झाले आहेत. प्रियांक व शाझाच्या घरी नव्या पाहुणीचं आगमन झालं आहे. प्रियांक हा श्रद्धाची मावशी पद्मिनी कोल्हापूरे यांचा मुलगा आहे. लाडक्या भावाच्या घरी लक्ष्मीचं आगमन झाल्यामुळे श्रद्धा आता आत्या झाली आहे.प्रियांक शर्मा हा मराठीसह बॉलीवूडमध्ये लोकप्रिय असलेल्या ज्येष्ठ अभिनेत्री पद्मिनी कोल्हापूरे आणि निर्माते प्रदीप शर्मा यांचा मुलगा आहे. तर, शाझा ही करीम व झारा मोरानी यांची लेक आहे. या दोघांचा विवाहसोहळा २०२१ मध्ये पार पडला होता. २१ फेब्रुवारी २०२४ रोजी यांच्या घरी नव्या पाहुणीचं आगमन झालं आहे.श्रद्धा कपूरने जानेवारी महिन्यात पार पडलेल्या शाझाच्या डोहाळे जेवणाला खास उपस्थिती लावली होती. यावेळी अभिनेत्रीचा मराठमोळा अंदाज पाहायला मिळाला. श्रद्धाने लिंबू रंगाचा ड्रेस, नाकात नथ, केसात गजरा असा पारंपरिक लूक केला होता.प्रियांक-शाझाला लेक झाल्याने श्रद्धा आत्या, तर अभिनेत्री पद्मिनी कोल्हापूरे आजी झाल्या आहेत. नव्या बाळाचं आगमन झाल्याने सध्या शर्मासह कपूर कुटुंबीयांमध्ये आनंदाचं वातावरण निर्माण झालं आहे. दरम्यान, मार्च २०२१ मध्ये प्रियांक शर्मा व शाझा मोरानी ख्रिश्चन पद्धतीने विवाहबंधनात अडकले होते. या आनंदाच्या प्रसंगी श्रद्धा कपूरसह तिचे संपूर्ण कुटुंबीय आणि मित्रमंडळी

प्रथमच रणजी स्पर्धेत विजय

## ६५ वर्षात प्रथमच रणजी स्पर्धेच्या लढतीत मिळवला विजय

# जम्मू काश्मीरचा दिल्लीला दणका!

## स्पर्धेत दिल्लीला नमवण्याची किमया

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**लिंबूटिंबू नव्हे तर मुख्य प्रवाहातील संघ म्हणून प्रस्थापित होऊ पाहणाऱ्या जम्मू काश्मीर संघाने रणजी करंडक स्पर्धेत पहिल्यांदाच दिल्लीला चीतपट केलं. ६५ वर्षात पहिल्यांदाच जम्मू काश्मीर संघाने दिल्लीला नमवण्याची किमया केली. १९६० पासून दिल्ली आणि जम्मू काश्मीर ४३ वेळा आमनेसामने उभे ठाकले. यापैकी ३७ सामन्यात दिल्लीने थेट विजय मिळवला.**



रणजी करंडक स्पर्धेत, ४ सामन्यांनंतर दिल्लीचे ७ गुण झाले आहेत. बाकी ६ संघांचीही हीच स्थिती आहे. बादफेरीसाठी पात्र ठरण्यासाठी दिल्लीला चमत्कार घडवावा लागेल. अंतर्गत बंडाळ्यांनी नेहमीच ग्रस्त असलेल्या दिल्लीचे डावपेच अनाकलनीय असे होते. अनुभवी कर्णधार नसणं, गटातटाचं राजकारण याचा फटकाही दिल्लीला बसला आहे. दिल्लीतल्या अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या लढतीत जम्मू काश्मीरने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला. ऑक्वीब नबीच्या ५ विकेट्सच्या बळावर काश्मीरने दिल्लीचा डाव २११ धावांतच गुंडाळला. दिल्लीतर्फे आयुश दोसेजाने ६५ तर कर्णधार आयुष बदोनीने ६४ धावांची खेळी केली. सुमीत माथूरने ५५ धावांची खेळी करत त्याला चांगली साथ दिली.

जम्मू काश्मीरने ३१० धावा करत महत्त्वपूर्ण आघाडी घेतली. कर्णधार पारस डोगराने १०६ धावांची खेळी केली. अब्दुल समदने ८५ धावा करत त्याला चांगली साथ दिली. दिल्लीकडून सिमरजीत सिंगने ६ विकेट्स घेतल्या.दिल्लीचा दुसरा डाव २७७ धावांतच आटोपला. आयुष बदोनीने ७२ तर आयुश दोसेजानाने ६२ धावांची खेळी केली. दिल्लीने काश्मीरसमोर १७९ धावांचं लक्ष्य मिळालं. कामरान अक्बलच्या तडाखेबंद १३३ धावांच्या खेळीच्या बळावर काश्मीर संघाने ७ विकेट्स राखून विजय मिळवला. त्याने २० चौकार आणि ३ षटकारांसह ही खेळी सजवली.काश्मीरला यंदाच्या हंगामातल्या सलामीच्या लढतीत मुंबईने हरवलं. या पराभवातून बोध घेत जम्मू काश्मीरने राजस्थानवर एक डाव आणि ४१ धावांनी विजय मिळवला. ऑक्वीब नबीने सामन्यात १० विकेट्स पटकावताना ५५ धावाही केल्या. त्यालाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. छत्तीसगढविरुद्धचा सामना अनिर्णित झाला. दिल्लीला हरवत जम्मू काश्मीरने चांगली आगेकूच केली आहे.लिंबूटिंबू नव्हे तर मुख्य प्रवाहातील संघ म्हणून प्रस्थापित होऊ पाहणाऱ्या जम्मू काश्मीर संघाने रणजी करंडक स्पर्धेत पहिल्यांदाच दिल्लीला चीतपट केलं. ६५ वर्षात पहिल्यांदाच जम्मू काश्मीर संघाने दिल्लीला नमवण्याची किमया केली. १९६० पासून दिल्ली आणि जम्मू काश्मीर ४३ वेळा आमनेसामने उभे ठाकले. यापैकी ३७ सामन्यात दिल्लीने थेट विजय मिळवला. रणजी करंडक स्पर्धेत, ४ सामन्यांनंतर दिल्लीचे ७ गुण झाले आहेत. बाकी ६ संघांचीही हीच स्थिती आहे. बादफेरीसाठी पात्र ठरण्यासाठी दिल्लीला चमत्कार घडवावा लागेल. अंतर्गत बंडाळ्यांनी नेहमीच ग्रस्त असलेल्या दिल्लीचे डावपेच अनाकलनीय असे होते. अनुभवी कर्णधार नसणं, गटातटाचं राजकारण याचा फटकाही दिल्लीला बसला आहे.दिल्लीतल्या अरुण जेटली स्टेडियमवर झालेल्या लढतीत जम्मू काश्मीरने टॉस जिंकून बॉलिंगचा निर्णय घेतला. ऑक्वीब नबीच्या ५ विकेट्सच्या बळावर काश्मीरने दिल्लीचा डाव २११ धावांतच गुंडाळला. दिल्लीतर्फे आयुश दोसेजाने ६५ तर कर्णधार आयुष बदोनीने ६४ धावांची खेळी केली. सुमीत माथूरने ५५ धावांची खेळी करत त्याला चांगली साथ दिली. जम्मू काश्मीरने ३१० धावा करत महत्त्वपूर्ण आघाडी घेतली. कर्णधार पारस डोगराने १०६ धावांची खेळी केली. अब्दुल समदने ८५ धावा करत त्याला चांगली साथ दिली. दिल्लीकडून सिमरजीत सिंगने ६ विकेट्स घेतल्या.दिल्लीचा दुसरा डाव २७७ धावांतच आटोपला. आयुश बदोनीने ७२ तर आयुश दोसेजानाने ६२ धावांची खेळी केली. दिल्लीने काश्मीरसमोर १७९ धावांचं लक्ष्य मिळालं. कामरान अक्बलच्या तडाखेबंद १३३ धावांच्या खेळीच्या बळावर काश्मीर संघाने ७ विकेट्स राखून विजय मिळवला.

## काश्मीरने चांगली आगेकूच केली

काश्मीरला यंदाच्या हंगामातल्या सलामीच्या लढतीत मुंबईने हरवलं. या पराभवातून बोध घेत जम्मू काश्मीरने राजस्थानवर एक डाव आणि ४१ धावांनी विजय मिळवला. ऑक्वीब नबीने सामन्यात १० विकेट्स पटकावताना ५५ धावाही केल्या. त्यालाच सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आलं. छत्तीसगढविरुद्धचा सामना अनिर्णित झाला. दिल्लीला हरवत जम्मू काश्मीरने चांगली आगेकूच केली आहे.

# ‘आज मेरे यार की शादी है’

## रोहित शर्माचा नवविवाहित जोडप्यासाठी खास डान्स

।नवी दिल्ली।

वृत्तसंस्था : महाईन्यूज

**रोहित शर्मांचे एकापेक्षा एक भन्नाट व्हीडिओ हल्ली व्हायरल होत असतात. रोहित शर्माने टी-२० आणि कसोटी क्रिकेटमधून निवृत्ती घेतल्यानंतर तो फक्त वनडे सामने खेळताना दिसतो. तर फावल्या वेळेत तो सराव करत आपल्या फिटनेसवर काम करताना दिसतो. रोहित शर्मांचे जिममध्ये असतानाचे फोटो, व्हीडिओ आपल्याला पाहायला मिळतात. यादरम्यान रोहित शर्माने एका नवविवाहित जोडप्यासाठी खास गाण लावत त्यावर नाचताना दिसला.**



सध्या सगळीकडे लग्नाचा माहोल सुरू आहे. यादरम्यान मुंबईतही एक जोडपं लग्नानंतर त्यांचं फोटोशूट करत होतो. त्याच इमारतीत रोहित शर्मादेखील होता. नवविवाहित दांपत्य ग्राउंडला फोटोशूट करत होतं. यादरम्यान रोहित शर्मा पहिल्या मजल्यावरील एका खिडकीत होता.रोहित शर्माने फोटोशूट करणाऱ्या जोडप्याला पाहताच स्पिकरवर ‘मेरे यार की शादी है’ हे गाण लावत तो नाचताना दिसला. रोहितने स्पिकरवर स्वत: हे गाण लावल्याचं सोशल मीडियावर बोललं जात आहे. यादरम्यान रोहित शर्माला नाचताना पाहून फोटोशूट करत असलेल्या नवऱ्याने हात जोडत हिटमॅनचे आभार मानले. तर नवरीने हा तर कमाल मोमेंट झाला असं म्हटलं.रोहित शर्माचा व्हीडिओ सध्या सोशल मीडियावर तुफान व्हायरल होत आहे. रोहित शर्माने पुन्हा एकदा त्याच्या या व्हीडिओमधील कृतीने सर्वांची मनं जिंकली आहेत. रोहित शर्मा घरच्या मैदानावर होणाऱ्या दक्षिण आफ्रिकाविरूद्धच्या वनडे मालिकेसाठी सराव करताना दिसत आहे.दक्षिण आफ्रिकेचा संघ सध्या भारताच्या दौऱ्यावर आला आहे.

## आफ्रिकेविरुद्ध २ कसोटी

यादरम्यान संघ तिन्ही फॉरमॅटमधील मालिका खेळेल. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या २ कसोटी सामन्यांच्या मालिकेनंतर, ३० नोव्हेंबरपासून एकदिवसीय मालिका सुरू खेळवली जाणार आहे, ज्यामध्ये रोहित शर्मा आणि विराट कोहली खेळताना दिसतील. भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील पहिला एकदिवसीय सामना रांची येथे खेळवला जाईल. दुसरा एकदिवसीय सामना ३ डिसेंबरला रायपूर येथे होईल.

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज ™
epaper.mahaenews.com
ePaper
। सोमवार ।
। दि. 25 ऑगस्ट 2025।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## इंद्रायणी साहित्य संमेलनाच्या स्वागताध्यक्षपदी

# निलेश बोराटे यांची निवड!

### इंद्रायणी साहित्य परिषदेच्या वतीने चौथे साहित्य संमेलनाचे मोशी येथे आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**इंद्रायणी साहित्य परिषदेच्या वतीने चौथे साहित्य संमेलन मोशी येथील पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर साहित्य नगरी (जय गणेश बँक्वेट हॉल) बीआरटी रोड, मोशी येथे रविवार, दि. 23 नोव्हेंबर रोजी आयोजित करण्यात आले आहे. या संमेलनाचे स्वागत अध्यक्ष पदी निलेश बोराटे यांची निवड करण्यात आली आहे.**






याचे उद्घाटन सकाळी 9 वाजता, ज्येष्ठ साहित्यिक व शिक्षण तज्ञ न. म. जोशी यांच्या हस्ते होणार आहे. उदघाटन सत्रात 99 व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांना यशवंतराव चव्हाण प्रज्ञावंत साहित्य पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार असल्याची माहिती परिषदेचे अध्यक्ष संदीप भानुदास तापकीर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

चिंचवड येथे आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष व ज्येष्ठ साहित्यिक अरुण बोऱ्हाडे, संमेलनाचे अध्यक्ष डॉ. सीमा सागर काळभोर, स्वागत अध्यक्ष निलेश उद्धव बोराटे, संस्थेचे सचिव रामभाऊ सासवडे, कार्याध्यक्ष सोपान खुडे, डॉ. पौर्णिमा कोल्हे, योगेश कोंढाळकर, राजेश बोराटे, अशोक ढोकले, दामोदर वहिले, श्रीहरी तापकीर, माणिक सस्ते, सुनील जाधव, अलंकार हिंगे, काळूराम दामू सस्ते, गणेश शशिकांत सस्ते, प्रा. संगीता थोरात, तेजस्विनी देशमुख आदी उपस्थित होते. या एक दवसीय साहित्य संमेलन उद्घाटनच्या दिवशी सकाळी 8 वाजता मोशी गावाचे ग्रामदैवत श्री नागेश्वर महाराज मंदिर येथून पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर साहित्य नगरी पर्यंत ग्रंथ दिंडी काढण्यात येईल. सकाळी 9 वाजता, ज्येष्ठ साहित्यिक न. म. जोशी यांच्या हस्ते उदघाटन होईल. यावेळी आमदार सुनील शेळके, बापूसाहेब पठारे आदींसह प्रमुख मान्यवरांच्या हस्ते "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर जीवन चरित्र प्रदर्शनाचे" उद्घाटन करण्यात येणार आहे. सकाळी 11 वाजता, "आजची युवा पिढी आणि साहित्य प्रवाह" हे चर्चासत्र प्राचार्य डॉ. पांडुरंग मिसाळ यांच्या अध्यक्षतेखाली होईल.

यामध्ये सचिन बेंडभर, तेजस्विनी देशमुख, रसिका सस्ते, मीनाक्षी पाटोळे आदी सहभाग घेणार आहेत. दुपारी 12 वाजता, मकरंद टिल्लू यांचा एकपात्री विनोदी कार्यक्रम, दुपारी 2 वाजता संमेलन अध्यक्षा डॉ. सीमा सागर काळभोर यांची प्रकट मुलाखत लेखिका डॉ. पौर्णिमा कोल्हे या घेणार आहेत. दुपारी 3 वाजता "पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे सांस्कृतिक योगदान" या विषयावर अहिल्याबाई होळकर यांचे वंशज भूषण राजे होळकर यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवादाचे आयोजन करण्यात आले आहे. यामध्ये डॉ. आम्रपाली कोकरे, रुपाली अवचरे, प्रणव पाटील, मीनल साकोरे सहभाग घेणार आहेत. समारोप सत्रामध्ये सायं. 5 वाजता, खासदार श्रीरंग बारणे, आमदार महेश लांडगे, ज्येष्ठ पत्रकार प्रकाश अकोलकर, जतीन देसाई यांच्या हस्ते भूमिपुत्र पुरस्काराचे वितरण करण्यात येणार आहे.

#### यांना भूमिपुत्र पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार

विराज विष्णू लांडगे (कबड्डी), प्रा. डॉ. अमित सूर्यकांत तापकीर (शैक्षणिक), सुचेता गोरक्षनाथ घिगे (प्रशासन), मानसी दत्तात्रय मोकाशी (आर्किटेक्ट), ॲड. सतीश नानासाहेब गोरडे (विधी सेवा), स्मिता परशुराम बोराडे (व्यक्तिमत्व विकास), विजय नामदेव चव्हाण (लेखक), हभप गोरक्षनाथ महाराज उदागे (समाज प्रबोधन) आणि डॉ. बी. एन. चव्हाण (शैक्षणिक) यांना भूमिपुत्र पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे. यानंतर सायं. 7 वाजता प्रतिबिंब कार संतोष घुले यांच्या अध्यक्षतेखाली "गजर मुशायरा" होणार आहे. यामध्ये प्रशांत पोरे, दिनेश भोसले, मीना शिंदे, अभिजीत काळे, नयन गोवंडे सहभाग घेणार आहेत अशी माहिती अरुण बोऱ्हाडे यांनी यावेळी दिली.

---

## 'रिअल लाईफ रिअल पीपल'तर्फे मोफत नेत्रतपासणी शिबिर

### भाजयुमो शहराध्यक्ष दिनेश यादव यांच्या वाढदिवसानिमित्त वृद्धाश्रमात सामाजिक उपक्रम

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतीय जनता युवा मोर्चा, पिंपरी चिंचवड शहर यांच्या वतीने शहराध्यक्ष दिनेश यादव यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक जाणिवेतून "रिअल लाईफ रिअल पीपल" या उपक्रमांतर्गत सावली निवारा केंद्र, वृद्धाश्रम येथे मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.**




भारतीय जनता युवा मोर्चा, पिंपरी चिंचवड शहर यांच्या वतीने शहराध्यक्ष दिनेश यादव यांच्या वाढदिवसानिमित्त सामाजिक जाणिवेतून "रिअल लाईफ रिअल पीपल" या उपक्रमांतर्गत सावली निवारा केंद्र, वृद्धाश्रम येथे मोफत नेत्र तपासणी व मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या शिबिरात वृद्धाश्रमातील ज्येष्ठ नागरिकांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीदरम्यान मोतीबिंदूची शस्त्रक्रिया आवश्यक असलेल्या रुग्णांची ओळख करून त्यांच्यावर विनामूल्य शस्त्रक्रिया करण्यात आली. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून समाजकल्याण विभागाचे मा. उपायुक्त संजय कदम तसेच भाजयुमो शहराचे सचिव अजित कुलथे उपस्थित होते. या प्रसंगी बोलताना त्यांनी म्हटले की, "अशा सामाजिक उपक्रमांमुळे तरुणांमध्ये सेवा वृत्ती रुजते आणि समाजाशी जोडलेपण अधिक दृढ होते."

या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी श्री. सुमित श्रीकांत घाटे (मंडल अध्यक्ष, भाजयुमो पिंपरी-दापोडी व अध्यक्ष, हिंदू गर्जना प्रतिष्ठान), श्री. राहुल सदाशिव खाडे (सरचिटणीस, भाजयुमो पिंपरी चिंचवड शहर) आणि सतीश नारायण नागरगोजे यांनी उत्कृष्ट नियोजन करून शिबिर यशस्वीरीत्या पार पाडले.

या कार्यक्रमाला भाजयुमो पिंपरी चिंचवड शहराचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. हा उपक्रम ८ नोव्हेंबर २०२५ रोजी संध्याकाळी ४ ते रात्री ८ या वेळेत, पिंपरी मार्केटकडे जाताना लालबहादूर शास्त्री पतसंस्था मागे, पिंपरी (पुणे-१८) येथे पार पडला.

"समाजातील प्रत्येक घटकापर्यंत सेवा पोहोचवणे हेच आमचे खरे ध्येय आहे. वृद्धांच्या डोळ्यातील प्रकाश टिकवून ठेवणे हीच आमच्यासाठी खरी भेट आहे. तरुणाईने समाजसेवेची जबाबदारी अंगीकारली, तर प्रत्येक घरात आनंद आणि सुरक्षितता येईल. अशा उपक्रमांतून

## सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने

# पिंपरी चिंचवड महापालिका आरक्षण सोडत जाहीर!

### पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या नियंत्रणाखाली आरक्षण सोडत

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महापालिकेच्या नियोजित सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने आरक्षण सोडत प्रक्रिया आज चिंचवड येथील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृह येथे पार पडली. राज्य निवडणूक आयोगाने या आरक्षण सोडतीच्या कामासाठी पुणे विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार प्राधिकृत अधिकारी म्हणून उपस्थित होते,त्यांच्या नियंत्रणाखाली सदर आरक्षण सोडत प्रक्रिया पूर्ण झाली.**

महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, तृप्ती सांडभोर, स्मार्ट सिटीचे सहायक मुख्य कार्यकारी अधिकारी किरणराज यादव यांच्यासह महापालिकेचे मुख्य अभियंता प्रमोद ओंभासे, सह आयुक्त मनोज लोणकर, सहायक नगर रचनाकार प्रशांत शिंपी, नगरसचिव मुकेश कोळप, सह शहर अभियंता अनिल भालसाकळे, बापू गायकवाड, मुख्य माहिती व तंत्रज्ञान अधिकारी विजय बोरुडे, निवडणूक विभाग उपायुक्त सचिन पवार, उपायुक्त अण्णा बोडदे, मुख्य सुरक्षा अधिकारी उदय जरांडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक यांच्यासह निवडणूक कामासाठी नियुक्त करण्यात आलेले महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी व कर्मचारी यावेळी उपस्थित होते.





### पुणे महापालिकेचे आरक्षण जाहीर!

पुणे महापालिकेच्या निवडणुकीच्या साठी महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्या उपस्थितीत आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली आहे. राज्यात महापालिका तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे बिगुल वाजले आहे. महापालिकेच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर सर्वच पक्षांकडून जोरदार तयारी करण्यात आली आहे. आज पुणे महापालिकेच्या निवडणुकीच्या साठी महापालिकेचे आयुक्त नवल किशोर राम यांच्या उपस्थितीत आज आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली आहे. पुणे महापालिकेच्या 41 प्रभाग आणि 165 सदस्यपदासाठी आरक्षण सोडत जाहीर झाले आहे. 83 जागा महिलांसाठी तर 82 जागा पुरुषांसाठी आहे तर महिलांच्या 83 जागामध्ये महिला खुला प्रवर्ग 48, ओबीसी महिला 23,एसी महिला 11, एसटी महिला 1 अश्या तर पुरुष मध्ये सर्वसाधारण 48,ओबीसी सर्वसाधारण 22,एस सी पुरुष 11, एस टी पुरुष 1 अस जाहीर करण्यात आले आहे.

### सोडतीनुसार निघालेले आरक्षण खालील प्रमाणे..

**प्रभाग क्रमांक: १**
अ) ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: २**
अ) ओबीसी महिला
ब) महिला सर्वसाधारण
क) सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : ३**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : ४**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) अनुसुचित जमाती
क) महिला ओबीसी
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : ५**
अ) महिला ओबीसी
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : ६**
अ) महिला ओबीसी
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: ७**
अ) ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : ८**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: ९**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: १०**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : ११**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: १२**
अ) ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: १३**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: १४**
अ) ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: १५**
अ) ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: १६**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: १७**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: १८**
अ) महिला ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: १९**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: २०**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक: २१**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : २२**
अ) महिला ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : २३**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : २४**
अ) ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : २५**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : २६**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : २७**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : २८**
अ) ओबीसी
ब) महिला सर्वसाधारण
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : २९**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) महिला अनुसुचित जमाती
क) ओबीसी
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : ३०**
अ) अनुसुचित जाती
ब) महिला अनुसुचित जाती
क) ओबीसी
ड) महिला सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : ३१**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण

**प्रभाग क्रमांक : ३२**
अ) महिला अनुसुचित जाती
ब) ओबीसी
क) महिला सर्वसाधारण
ड) सर्वसाधारण


www.rklgis.org
RKL GALAXY
International School
CBSE Affiliated School | Jain Minority Institution
RKL Galaxy International School
EMPOWERING YOUNG MINDS THROUGH LEARNING
ADMISSION
OPEN
FOR THE YEAR
2026-27
NURSERY - STD X
What we Offer?
CBSE Curriculum
Separate Sports Teachers
for Indoor & Outdoor Sports
Digital Classrooms with AV Facilities
Skill Development Programs:
Robotics
Dance, Music, Speech & Drama
Entrepreneurship
Focus on Holistic Development
Enroll Now!
Admission open for 2026-27 | Book Your Spot Today!
8698360005 | 9637339988 | Opp. to Alankapuram Society, Wadmukhwadi, Alandi Road, Pune


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
• Documentary
• Weddings
• Drone
• Motion Graphics
• Testimonials
• Tutorial videos
• Product Videos
• Animation
• Social Media Content
• Promotional Videos
• Real Estate
• Corporate
• Advertising
• Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046